मिरा भाईंदर महानगरपालिका
सचिव विभाग
आवक क्र. ७५/२०१८-१९
दिनांक :- १५/१२/२०१८

केंद्रशासनाचा
माहितीचा अधिकार
नियम २००५ जोडपत्र -अ
(नियम ३)

२२३३
१५/१२/१८

10 रु. कोर्ट फी COURT FEE 15 DEC 2018 Rs.10 भारत INDIA दस रुपये TEN RUPEES

प्रति,
सचिव विभाग / ~~नगर रचना विभाग / बांधकाम विभाग~~ परवाना विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

| | | |
|---|---|---|
| १) अर्जदाराचे संपूर्ण नांव | :- | सुधीर महाडीक |
| २) पत्ता | :- | एस. व्ही. रोड, नवघर रोड, भाईंदर (पूर्व) मो - ९८९२३४६७२७ |
| एक) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल | :- | महापालिका क्षेत्रातील लॉजिंग आणि बोर्डींग बाबत. |
| दोन) माहिती ज्याच्याशी संबंधित असेल तो कालावधी | :- | आत्ता पर्यंत |
| तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन | :- | १) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जे नोंदणीकृत लॉजिंग आणि बोर्डींग आहेत त्या लॉजिंग आणि बोर्डींगच्या नावांची माहिती तसेच त्यांना आपल्या प्रशासनाकडून दिलेली परवानगी यांची संचिका सत्यप्रत करून मिळावी.<br>२) लॉजिंग आणि बोर्डींग नोंदणीसाठी आपल्या प्रशासनाकडून जी कागदपत्रे मागवण्यात येतात त्या कागदपत्रांची सत्यप्रत करून मिळावीत.<br>✓३) लॉजिंग आणि बोर्डींग संदर्भात महापालिकाच्या मा. महासभेचा ठराव तसेच इतर नियमावली सत्यप्रत करून मिळावी.<br>४) तसेच संबंधित विषयातील इतर सर्व कागदपत्रे सत्यप्रत करून मिळावीत. त्यासाठी आपल्या कार्यालयाकडून आकारण्यात येणारे शुल्क भरणा करण्याची माझी तयारी आहे. |
| चार) माहिती टपालाने मिळणे आवश्यक आहे. किंवा स्वतः घेवून जाणार आहात किंवा कसे (ज्यादा शुल्कामध्ये प्रत्यक्ष टपाल खर्चाचा समावेश असेल | :- | सदरची माहिती लेखी स्वरुपात आवश्यक आहे. |
| पाच) जर टपालाने माहिती हवी असेल तर कोणत्या टपालाने हवी आहे (सर्व साधारण, नोंदणीकृत, किंवा शीघ्र) | :- | स्वत: |
| ४) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे किंवा कसे (असल्यास त्याच्या पुराव्यादाखल छायाप्रत जोडावी) | :- | नाही |

ठिकाण :- भाईंदर

दिनांक :- १५ डिसेंबर २०१८

अर्जदाराची सही

सुधीर महाडीक

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग


जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./ ७६ /2018 दिनांक :- १८ /१२/2018

**प्रति,**
**श्री. सुधीर महाडीक,**
**एस.व्ही.रोड, नवघर रोड,**
**भाईंदर (पूर्व)**

**विषय :-** **केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.**
**महानगरपालिका क्षेत्रातील लॉजिंग आणि बोर्डींग बाबत.**

**संदर्भ :-** **आपणांकडील दि. 15/12/2018 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.**
**(या कार्यालयास प्राप्त दि. 17/12/2018)**

**महोदय,**

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण महानगरपालिका क्षेत्रातील लॉजिंग आणि बोर्डींग संबंधीत कागदपत्रांची मागणी केलेली आहे. संदर्भित पत्राचे अवलोकन केले असता मुद्दा क्र. 3 (अंशत:) नगरसचिव विभागाशी व मुद्दा क्र. 1, 2, 3 (अंशत:) व 4 परवाना विभागाशी निगडीत असल्याचे दिसून येत आहे.

मुद्दा क्र. 1, 2, 3 (अंशत:) व 4 परवाना विभागाशी निगडीत असल्याने उक्त मुद्दयांची माहिती आपणांस उपलब्ध करुन देणेसाठी संदर्भित पत्राची छायांकित प्रत मनपा/सचिव/मा.अ./76/2018, दि. 19/12/2018 अन्वये परवाना विभागात अग्रेषीत करण्यात आलेली आहे. संदर्भास्तव सोबत पोहोच पत्राची छायांकित प्रत देत आहोत.

मुद्दा क्र. 3 अन्वये आपण लॉजिंग आणि बोर्डींग संदर्भात महासभेत पारित ठराव व नियमावलीची प्रत मागणी केलेली आहे. मुद्दा क्र. 3 मधील महासभेत पारित ठराव हा विषय नगरसचिव विभागाशी निगडीत असल्याने, आपणांस लॉजिंग आणि बोर्डींग संदर्भात महासभा दि. 20/02/2008 ठराव क्र. 27 व महासभा दि. 29/09/2011 ठराव क्र. 62 च्या सत्यप्रती या पत्रासोबत उपलब्ध करुन देत आहोत. (एकुण पाने 02)

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

कळावे.

19/12/2018

**(कैलास दा. म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**

pc 2\\Pranali\d\Mahiti Adhikar\Letter - Sudhir mahadik.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./ ७६ /2018 दिनांक :- १८ /१२ /2018

**प्रति,**
**जनमाहिती अधिकारी,**
**परवाना विभाग,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**विषय :-** **केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.**
**महानगरपालिका क्षेत्रातील लॉजिंग आणि बोर्डींग बाबत.**

**संदर्भ :-** **आपणांकडील दि. 15/12/2018 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.**
**(या कार्यालयास प्राप्त दि. 17/12/2018)**

**महोदय,**

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये अर्जदार यांनी महानगरपालिका क्षेत्रातील लॉजिंग आणि बोर्डींग संबंधीत कागदपत्रांची मागणी केलेली आहे. संदर्भित पत्राचे अवलोकन केले असता मुद्दा क्र. 1, 2, 3 (अंशत:) व 4 परवाना विभागाशी निगडीत असल्याचे दिसून येत असल्याने, उक्त मुद्दयांची माहिती अर्जदारांस उपलब्ध करुन देणेसाठी संदर्भित पत्राची छायांकित प्रत परवाना विभागात अग्रेषीत करण्यात येत आहे. तरी अर्जदारांस अपेक्षीत माहिती मुदतीत देण्यात यावी ही विनंती.

**(कैलास दा. म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**

**प्रत माहितीस्तव :-**
**श्री. सुधीर महाडीक,**
**एस.व्ही.रोड, नवघर रोड,**
**भाईंदर (पूर्व)**

पोच
19/12/18
परवाना विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

pc 2\\Pranali\d\Mahiti Adhikar\Letter - Sudhir mahadik.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २९/०९/२०११

**प्रकरण क्र. ५९ :-** **सन्मा. सदस्य श्री. अनिल दिवाकर सावंत यांचे दिनांक १९/०९/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.**

**मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये अनधिकृतपणे चालणाऱ्या लॉजींग बोर्डींगबाबत.**

**ठराव क्र. ६२ :-**

मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये अनधिकृतपणे लॉजींग-बोर्डींग चालविण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. या संदर्भात मा. महासभा दि. १६/०१/२००९ मध्ये लक्षवेधीद्वारे चर्चा होऊन अनधिकृत लॉजींग-बोर्डींगवर त्वरीत कायदेशीर कारवाई करावी व यानंतर शहरामध्ये लॉजींग-बोर्डींगचे परवाने देवू नयेत, असे सर्व सदस्यांच्या मते ठरविण्यात आले. तसेच तत्कालीन मा. महापौरांनी तसे आदेश दिले. तसेच मा. पोलीस अधिक्षक, भा.प्र.से. ठाणे ग्रामीण यांनी जावक क्र. अशाप/क्र.आर/४०५/वे.व्यवसाय/५१२-२००८, दि. १३/०३/२००८ या पत्राद्वारे लेखी स्वरुपात महापालिकेला अनधिकृत लॉजींग-बोर्डींगची (२४) यादी देऊन त्यांच्यावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ आणि नियम (एम.आर.टी.पी.ॲक्ट) कलम ५२,५३,५४,५५ व ५६ अन्वये कारवाई करावी, असे स्पष्ट निर्देश दिलेत.

तरी सुध्दा महानगरपालिकेने अनधिकृत लॉजींग-बोर्डींगवर कारवाई केलेली नाही. तसेच दि. १६/०१/२००९ नंतर २७ नवीन लॉजींग-बोर्डींगना नवीन परवाने दिले व परवाने देतेवेळी त्यातील बऱ्याचशा लॉजींग-बोर्डींग व्यवसायधारकांनी कागदपत्रांची पुर्तता केलेली नाही. ही बाब अतिशय गंभीर असुन शहरातील सामाजिक जीवन बिघडवणारी आहे. १६/०१/२००९ नंतरचे परवाने रद्द करावेत.

तरी अनधिकृत लॉजींग-बोर्डींग परवाना आस्थापनांवर त्वरीत कायदेशीर कारवाई करावी, त्यांचे परवाने रद्द करावेत. नळ जोडणी खंडीत करावी व रिलायन्स एनर्जीला वीज जोडणीसाठी दिलेले ना हरकत प्रमाणपत्र रद्द करावे.

**सुचक :- श्री. अनिल दिवाकर सावंत** **अनुमोदक :- श्री. शफिक अहमद सादत खान**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. भगवती शर्मा यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

मे. सेव्हन इलेवन हॉटेल्स प्रा. लि. यांना मनपा जा.क्र. मनपा/परवाना/२४/२०११-१२, दि. २७/०४/२०११ अन्वये दिलेली परवानगी रद्द करण्यात यावी व या हॉटेल्ससाठी दिलेला विद्युत पुरवठा व पाणी कनेक्शन त्वरीत काढून टाकावे.

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्या श्रीम. मर्लिन डिसा व अनुमोदक सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

मिरारोड व भाईंदरमध्ये अनधिकृत हुक्का पार्लरचेही परवाने रद्द करण्यात यावेत व त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

उपरोक्त सुचनेत नमुद प्रस्ताव हा अनधिकृत लॉजींग-बोर्डींगवर कायम स्वरुपी प्रतिबंधात्मक कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणे तसेच श्री. सुरेश येवले यांनी मिरा भाईंदर शहराचा प्रमुख काशिमिरा गावाकडे जाणारा छत्रपती शिवाजी महाराज मार्ग या प्रमुख मार्गालगत असलेल्या दोन्ही बाजु असलेल्या नऊ (९) फुट रुंद रस्त्यावर नव्याने किंवा जुनी अतिक्रमणे कायमस्वरुपी तोडण्याकरीता मा. मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिकेवर दिलेल्या डिव्हीजनबेंच निर्णयाचे पालन करावे ही माझी सुचना आहे.

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. सदस्या श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे व अनुमोदक सन्मा. सदस्य श्री. टेरी परेरा यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

हॉटेल स्वीट ड्रीम मिरारोड स्टेशन समोरील लॉजींग-बोर्डींग, रेड नाईट व रेड हॉर्स बार, दहिसर चेकनाका हॉटेल मंथरा ते पेणकरपाडा पर्यंत असलेले लॉजींग-बोर्डींग तसेच काशिमिरा परिसरातील व वर्सोवा पर्यंत असलेले सर्व लॉजींग-बोर्डींग व बार अधिकृत किंवा अनधिकृत? याबाबत चौकशी करुन अनधिकृत असल्यास सदर लॉजींग-बोर्डींगवर तातडीने कारवाई करुन परवाना रद्द करावा.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या सौ. कल्पना म्हात्रे यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर परिसरात बेकायदेशीर ब्ल्यु फिल्म सेंटर चालु आहेत, त्यावर त्वरीत कारवाई होऊन त्यांचे परवाने रद्द करावे.

ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली प्रमाणित प्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २०/०२/२००८

**प्रकरण क्र. २८ :-** हॉटेल त्यामध्ये असलेले लॉजींग-बोर्डींग, सार्व. हॉल व मंगल कार्यालय व त्या लगतच्या मोकळ्या जागेचा व्यावसायीक वापर होत असल्याने त्यावर कर आकारणी करणेसाठी वार्षिक भाडे मुल्य दरास मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. २७ :-**

महानगरपालिका हद्दीत मालमत्तांना कर आकारणी करणेसाठी (करयोग्य मुल्य ठरविणेसाठी) भाडेमुल्याचे वाजवी दर महासभा ठराव क्र. ४३ दि. २१/०८/२००६ अन्वये मंजूर करण्यांत आलेले आहेत. या मंजूर दरामध्ये मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात घराच्या वेगवेगळया प्रकारानुसार दर मंजूर केले आहेत. महानगरपालिका हद्दीत लॉजींग-बोर्डीगसह हॉटेल, सार्व. हॉल, मंगल कार्यालये इत्यादी मालमत्ता आहेत. या मालमत्ता दैनंदिन भाडयाने दिल्या जातात. मात्र यावर कर आकारणी मालकी हक्काच्या (स्वतः वापरातील) दराप्रमाणेच सर्वसाधारण मालमत्ता धारकांना ज्या दराने कराची आकारणी केली जाते त्या दराने कर आकारणी केली जाते. वास्तविकतः लॉजिंग-बोर्डींग, हॉल भाडयाने देऊन मालमत्ता धारक उत्पन्न मिळवितात. असे उत्पन्न कमवून देखील सर्वसाधारण मालमत्ता धारकाप्रमाणेच त्यास कराची आकारणी केली जाते. वास्तविक सदर मालमत्ता भाडे रुपाने उत्पन्न मिळवीत असल्याने अशा मालमत्तांना जादा दराने कर आकारणे आवश्यक आहे.

तसेच सार्व. हॉल, मंगल कार्यालय, हॉटेल, क्लब इत्यादी अन्य लगत असलेल्या मोकळया जागेचा व्यावसायीक वापर करण्याऱ्या मोकळया जागेवर कर आकारणी केली जात नाही. अशा मालमत्तापासून मालमत्ता धारक उत्पन्न मिळवित असल्याने त्यावरही कर आकारणी करणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे लॉजींग-बोर्डीगसह हॉटेल, सार्व.हॉल, मंगल कार्यालये व व्यावसायिक कामांसाठी वापरत असलेल्या मोकळया जागेवर खालील प्रमाणे मालमत्तेचे वार्षिक भाडेमूल्य ठरविण्यासाठी दर लागू केल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल.

| अ. क्र. | मालमत्तेचा तपशिल | वार्षिक भाडे मुल्यासाठी सध्याचा दर (प्र. चौ. फुट., प्र. महिना) | वार्षिक भाडे मुल्यासाठी प्रस्तावित दर (प्र. चौ. फु., प्र. महिना) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | हॉटेलसह लॉजिंग बोर्डींग, सार्व. हॉल, मंगल कार्यालये. | रु. ३.०० प्र. चौ. फुट (आर. सी. सी.) | रु. ५.०० प्र. चौ. फुट |
| | | रु. २.५० प्र. चौ. फुट (लोड बेरींग, सिमेंट पत्रे व कौलारु) | रु. ४.०० प्र. चौ. फुट |
| २ | हॉटेल, सार्व. हॉल, मंगल कार्यालय लगतच्या लॉन्स, मोकळया जागा व अन्य व्यावसायिक वापर करणाऱ्या जागा. | सध्या कर आकारणी करत नाही. | रु. १.०० प्र. चौ. फुट |
| ३ | मोठी-मोठी हॉटेल्स, रिसॉर्ट, मॉल्स, शॉपिंग सेंटर, वाणिज्य वापर करीता असेल | ---- | रु. ५.०० प्र. चौ. फुट |

वरील प्रमाणे (कॉलम ४ नूसार) भाडेमूल्याच्या दरास ही सभा मंजूरी देत आहे..

**सुचक :- श्री. भगवती शर्मा.    अनुमोदक :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे.**

सदर ठरावात सुचक :- श्री. शशिकांत भोईर व अनुमोदक :- श्री. मधुसुधन पुरोहित ह्यांनी उपसुचना मांडलेली आहे ती खालील प्रमाणे.

सदर मुळ ठरावात हॉटेल लॉजिंग बोर्डिंग सार्व. हॉल, मंगल कार्यालय लगतच्या मोकळ्या जागेच्या व्यावसायिक वापरावर भाडेमुल्यांचे दर निश्चित करताना या सोबत शहरात उभे राहणारे मॉल व क्लबचा समावेश करावा. मॉलची जागा भाड्याने दिली असल्यास संबंधित मालमत्ता धारकांवर मालमत्ताकर भाडे तत्वावर असलेल्या जागेवर भाडे दर मुल्य दराने लावावा. तसेच आरक्षणात बांधित असलेल्या अनाधिकृत बांधकाम किंवा व्यावसायिक वापर होत असलेल्या जागा मोकळ्या करण्यात याव्या.

उपसुचनेसह ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका